महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२ web:-www.doa.maharashtra.gov.in

क्रमांक - डिओओ/२०२१-२२/चार/५६७ दिनांक :- 7 MAR 2022

संदर्भ :- १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/ एसडी-२, दिनांक २० डिसेंबर, २०१७.

२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिओओ/२०२१-२२/चार/४९, दिनांक १७.०२.२०२२.

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिओओ/२०२१-२२/चार/५१, दिनांक २१.०२.२०२२.

## परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील इयत्ता १० वी व मुलभूत / कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता एप्रिल, २०२२ मध्ये ऑफलाईन पध्दतीने शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२१ चे आयोजनाकरिता परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करावयाची असल्याचे संदर्भीय परिपत्रक क्रमांक २ नुसार कळविण्यात आले होते.

इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेला मिळणाऱ्या श्रेणीच्या आधारे सवलतीच्या गुणांसाठी उक्त संदर्भीय क्रमांक १ या शासन शुध्दीपत्रानुसार विद्यार्थी एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. कला संचालनालयाचे दिनांक २१.०२.२०२२ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/एसडी-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ नुसार सन २०२१-२२ यावर्षापुरते केवळ इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शिकत असलेल्या इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रविष्ठ होणारे इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे सवलतीचे गुण मिळणार नसल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता एलिमेंटरी परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील इयत्ता ९ वी मधील विद्यार्थ्यांकरिता एलिमेंटरी परीक्षा तसेच इयत्ता १०वी व मुलभूत / कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता इंटरमिजिएट परीक्षेचे आयोजन दिनांक ०९ एप्रिल, २०२२ ते १२ एप्रिल, २०२२ या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील सर्व परीक्षा केंद्रावर ऑफलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येणार आहे.

शासकीय रेखाकला परीक्षा केंद्रांची नोंदणी, विद्यार्थ्यांची नोंदणी, परीक्षा फी व परीक्षक/समालोचक/ उपमुख्य समालोचक यांच्या अर्जाची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने www.doa.maharashtra.gov.in / https://dge.doamh.in या संकेतस्थळावर करावयाची आहे.

ऑनलाईन पध्दतीने नोंदणीच्या कालावधीचा तपशील व सविस्तर वेळापत्रक खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | केंद्रांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे | दिनांक ०९.०३.२०२२ ते दिनांक १५.०३.२०२२ पर्यंत |
| २ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. | दिनांक १०.०३.२०२२ ते दिनांक २५.०३.२०२२ पर्यंत. |
| ३ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा फी पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाईन पध्दतीने भरणा करणे. | दिनांक १५.०३.२०२२ ते दिनांक २५.०३.२०२२ पर्यंत. |
| ४ | परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे | दिनांक २१.०३.२०२२ ते ३१.०३.२०२२ पर्यंत. |

## शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२१

### *एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक*

**(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शिकत असलेल्या केवळ इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांकरिता)**

| अ.क्र. | विषयाचे नाव | परीक्षेची वेळ |
|---|---|---|
| | ***शनिवार, दिनांक ०९ एप्रिल, २०२२*** | |
| १ | वस्तुचित्र (Object Drawing) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |
| | ***रविवार, दिनांक १० एप्रिल, २०२२*** | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| ४ | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |

### *इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक*

**(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शिकत असलेल्या केवळ इयत्ता १० वी व मुलभूत / कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (प्रथम वर्ष) या विद्यार्थ्यांकरिता)**

| | | |
|---|---|---|
| | ***सोमवार, दिनांक ११ एप्रिल, २०२२*** | |
| १ | स्थिरचित्र (Still Life) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.३० ते ४.३० (२.०० तास) |
| | ***मंगळवार, दिनांक १२ एप्रिल, २०२२*** | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| ४ | कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन (Geometry, Solid Geometry & Lettering) | २.३० ते ५.३० (३.०० तास) |

<u>परीक्षा फी तपशील खालील प्रमाणे.</u>

| परीक्षेचे नाव | परीक्षा फी प्रति विद्यार्थी | केंद्र खर्चाची रक्कम प्रति विद्यार्थी | प्रश्नपत्रिकांच्या छायांकित प्रत प्रति विद्यार्थी रक्कम | परीक्षा केंद्रांने ऑनलाईन पध्दतीने जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २०२१ | रु.५०/- | रु.२०/- | * रु.१०/- | रु.५० - रु.३० = **रु.२०/-** |
| इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २०२१ | रु.१००/- | रु.२०/- | * रु.१०/- | रु.१०० - रु.३० = **रु.७०/-** |

*(* विषय क्रमांक १ ते ३ करिता रु.२.०० प्रमाणे रु.६.०० व पेपर क्रमांक ४ करिता रु.४.०० याप्रमाणे एकूण रु.१०/- प्रश्नपत्रिकांच्या छायांकित प्रतिंकरिता)*

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्यांना सवलतीच्या गुणांचा लाभ मिळावा याकरिता, इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २०२१ चा निकाल एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा २०२१ च्या अगोदर जाहीर करण्यात येईल.

ऑनलाईन पध्दतीने करावयाची नोंदणी व संबंधित माहिती www.doa.maharashtra.gov.in / https://dge.doamh.in या संकेतस्थळावर दिनांक ०९ मार्च, २०२२ पासून उपलब्ध राहील.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति,
सर्व केंद्र प्रमुख तथा मुख्याध्यापक /प्राचार्य, शासकीय रेखाकला परीक्षा यांचेकरिता.
प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक, (माध्यमिक )महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
४) अध्यक्ष/सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
५) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
७) शिक्षणनिरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम.
८) अधिष्ठाता /प्राचार्य, सर्व कला महाविद्यालय.
९) निवड नस्ती.